प्रेस नोट

ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगाव
दि.०८/०१/२०२५

**आलोसे नितीन शेषराव भोई वय ३१ वर्ष तलाठी रा.प्रतिभा गॅस एजन्सी ,कालंका माता मंदिराजवळ ,जळगाव (खाते महसुल विभाग वर्ग ३ ) यांनी ३००० रु.लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत**

--------------------------------------------OOO--------------------------------------------

यातील तक्रारदार यांना मौजे रायपुर,ता.जि.जळगाव येथील भुखंड नं.५२ चे एकुण क्षेत्र ३.४१.६० चौ.मी.चे ७/१२ उताऱ्यावर स्लॅब रजिस्टर प्रमाणे त्यांचे आई, वडील व भाऊ अनिल यांचे नाव लावुन पाहीजे होते. त्या बाबत तक्रारदार यांनी त्यांचा चुलत भाऊ मनोज परदेशी,रा.रायपुर ता.जि.जळगाव यांचेसह कुसुंबा खुर्द गावचे तलाठी कार्यालयात जावुन आलोसे यांची भेट घेवुन कागदपत्रे दाखवली होती. तेव्हा आलोसे यांनी सदरचे काम करुन देण्याचे मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे ५ हजार रुपये लाच रकमेची मागणी केली होती. त्याबाबत फिर्यादी यांनी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर लाच मागणी तक्रारीची दि.०७.०१.२०२५ रोजी पंचासमक्ष प्रथम लाचमागणी पडताळणी केली असता आलोसे यांना तक्रारदार यांचे कामा संदर्भातील विषय समजला नाही म्हणुन त्यांनी तक्रारदारास भुसंपादन अधिकारी पुर्नवसन शाखा यांचेकडे जा असे सांगीतल्याने तक्रारदार तेथुन निघुन आले होते. त्यानंतर तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे त्यांचा चुलत भाऊ मनोज परदेशी, रा.रायपुर, ता.जि.जळगाव तसेच पंच क्र.१ सोनवणे यांचे सोबत लाचमागणी पडताळणीसाठी पाठवले असता आलोसे यांनी मौजे रायपुर येथील भुखंड नं.५२ चे एकुण ३.४१.६० चौ.मी. क्षेत्राचे ७/१२ उताऱ्यावर स्लॅब रजिस्टर प्रमाणे तक्रारदार यांची आई, वडील व भाऊ अनिल यांचे नाव लावुन देण्याचे मोबदल्यात प्रथम ५ हजार व तडजोडीअंती ३ हजार रुपये लाच रकमेची मागणी करुन,तडजोडी अंति ३ हजार रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. व सदर लाच रक्कम आज दि.०७.०१.२०२५ रोजी १६.५५ वा.चे सुमारास कुसुंबा खुर्द तलाठी कार्यालयाबाहेर पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा.

सदरची कारवाई मा.भारत तांगडे ,पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री.माधव रेड्डी ,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश जी.ठाकूर ,पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.जळगाव करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर या सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहीजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दुरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लॅंडलाईन ते लॅंडलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्रि नं. १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | ०२५७ - २२३५४७७ | १०६४ |
| २ | नाशिक | ०२५३ - २५७५६२८ , २५७८२३० | १०६४ |
| ३ | अहमदनगर | ०२४१ - २४२३६७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२ - २३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४ - २३०००९ | १०६४ |

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव